महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

क्र.साप्रवि/रवका/सा.आ.११७/न.क्र.५६९/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

## प्रशासकीय परिपत्रक क्र.१०१ दिनांक १८-०४-२००७

विषय : म.रा.विद्युत् वितरण कं.मर्या. मधील कर्मचाऱ्यांना एप्रिल २००७ पासून सुधारित दराने महागाई भत्ता देण्याबाबत.

वाचा : स.सा.आ.क्र.११७ (क) दिनांक ३१.३.१९८६
सुधारपत्र क्र.२९ दिनांक २.२.२००२
सुधारपत्र क्र.३० दिनांक ६.६.२००२
सुधारपत्र क्र.३१ दिनांक १७.९.२००३
सुधारपत्र क्र.३२ दिनांक २९.६.२००४
सुधारपत्र क्र.३३ दिनांक ७.१०.२००४
सुधारपत्र क्र.३४ दिनांक ४.६.२००५
सुधारपत्र क्र.३५ दिनांक ५.८.२००५ व
सुधारपत्र क्र.३६ दिनांक १८.२.२००६
प्रशासकीय परिपत्रक क्र.४८ दि.१९.५.२००६
प्रशासकीय परिपत्रक क्र.८० दि.१०.१०.२००६

............

महाराष्ट्र शासनाने वेळेवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या आधारे तत्कालीन म.रा.वि.मंडळाच्या पुनर्रचित महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांसाठी सुधारित दराने महागाई भत्ता मंजूर केला जातो.

२. आता शासन निर्णय वित्त विभाग क्र.मभवा-११०७/प्र.क्र.२७/सेवा-९ दि.१० एप्रिल २००७ अन्वये महाराष्ट्र शासनाने, शासनाच्या सर्व कर्मचाऱ्यांना दि.०१.०४.२००७ पासून वेतनश्रेणीतील मूळ वेतनाच्या ६ टक्के वाढीव दराने म्हणजे २९% ऐवजी ३५ % या सुधारित दराने महागाई भत्ता मंजूर केला आहे.

३. शासनाच्या धर्तीवर म.रा.विद्युत् वितरण कं.मर्यादित मधील सर्व कर्मचाऱ्यांना ७९% ऐवजी ८५% या सुधारित दराने दि.०१.०४.२००७ पासून महागाई भत्ता देण्याबाबत संचालक (संचलन) आणि संचालक (वित्त) यांच्याशी विचार विनिमय करुन व्यवस्थापकीय संचालक म.रा.विद्युत् वितरण कं.मर्या.यांनी मंजुरी दिली आहे.

४. परिच्छेद क्र.३ मध्ये नमूद केलेल्या सुधारित दरानुसार महागाई भत्त्याची रक्कम महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांना माहे एप्रिल २००७ पासूनच्या वेतनामध्ये समाविष्ट करुन देण्यात यावी.

५. महागाई भत्त्याची रक्कम प्रदान करण्यासंबंधात विद्यमान तरतुदी व कार्यपध्दती आहे तशाच यापुढेही लागू राहतील.

६. संबंधित अधिकाऱ्यांना विनंती करण्यात येते की त्यांनी महागाई भत्त्याची वाढीव रक्कम प्रदान करण्यासाठी आवश्यक असलेल्या निधीसाठी, सह मुख्य लेखा अधिकारी (अर्थोपाय विभाग), हाँगकाँग बँक बिल्डिंग, ४ था मजला, मुंबई - ४०० ०२३ यांचेकडे त्वरित मागणी करावी.

(सु. य. पाटील)
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

प्रत :
म.रा.विद्युत वितरण कं.मर्या.च्या प्रेषण यादीप्रमाणे.
D.A.Circular - Sept.2006